# लावण्याची प्रतिमा

पाहून तुझ्या रूपसौंदर्याला
चंद्रहि लाजून ढगाआड लपला
कसे वर्णू मी तुज रूपाला
शब्दहि अपुरे त्या बंधाला
रंग तुझा तांबूस गोरा
पाहून, केतकीलाहि वाटेल हेवा
नयन तुझे जणू कमल
त्यांत दिव्य तेज विपुल
नासिका तुझी नाजूक सरल
चाफेकळीसम अति मृदुल
गालावर फुलले गुलाब
ओठ जणू लाल शराब
हनुवटीवर तीळ सुबक
लावण्याचा एक रक्षक
ओठावर हास्य मधुर
चेहऱ्यावर भाव चतुर
लांब काळे कुंतल अपार
जणू मेघांनी आच्छादिले अंबर
सडपातळ रेखीव काया सुंदर
रानात विहरते जशी हरणी चतुर
कविमनातील एक कल्पना
लावण्याची तू सुरेख प्रतिमा

■ – पद्‌माकर चित्रे

('शब्दांची फुलपाखरे' या कवितासंग्रहातून)